ISSN : 2278-9308

# Sanshodhan Samiksh

*Humanities, Social Sciences, Commerce,*
*Education, Law and Language*
*Monthly Peer Reviewed International Research Journal*
***Special Issue December -2015***




■ Chief Editor - Prof. Virag S. Gawande
■ Editor - Dr. Sanjay J. Kothari

*- Published By -*
AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | डॉ. गुणवंत सोनोने | उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षणतज्ञ– प्रा. ना. ग. पवार | 98 |
| 25 | डॉ. अर्जुन एस. पाटील | आर्थिक विकास व रोजगारनिर्मिती | 100 |
| 26 | प्रा. डॉ. विशाखा वंजारी | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्त्रीसुधारणाविषयक विचार | 107 |
| 27 | प्रा.डॉ.सौ. अरुणा.प्र.पाटील.<br>श्री.शशीकांत रु.कडू. | अमरावती जिल्हयातील बदलत्या पिक प्रारुपाचा अभ्यास २००१-२०११ | 111 |
| 28 | प्रा.दत्तात्रय शेळके | अनुवाद की प्रविधि एवं प्रक्रिया | 116 |
| 29 | प्रा. मोहनलाल क. रामटेके | गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामाचे आर्थिक विश्लेषण वर्ष 2014–15 | 119 |
| 30 | डॉ.प्रा. एस. एम. भोवते | भारतातील महीलांच्या सामाजिक समस्या | 123 |
| 31 | प्रा. शिंदे प्रविण कारभारी | नक्षलवादी चळवळ | 126 |
| 32 | प्रा. भारती दि. रत्नपारखी | दलित साहित्याचा भटक्या विमुक्तांच्या साहित्यावर पडलेला प्रभाव" | 128 |
| 33 | प्रा. डॉ. वाय एम. साळुंके | जपानचा आक्रमक राष्ट्रवाद व दुसरे महायुध्द | 131 |
| 34 | वसुंधरा दत्ताराम साळुंखे | महिती संप्रेषण तंत्रज्ञानाचे साधन भ्रमणध्वनीचा महाविद्यालयीन विद्यार्थी करीत असलेला अध्यनासाठी वापर | 136 |
| 35 | प्रा. सोमेश्वर गिरमाजी सेलोकर | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्रीपात्रांचा विविधांगी अभ्यास | 142 |
| 36 | प्रा.आनंद व्ही.पवार | लोकशाही विकेंद्रीकरणचे प्रभावी साधन - पंचायत राज | 147 |
| 37 | डॉ. योगीराज एस. उरकुडे | गडचिरोली जिल्हयातील समृध्द प्राचीन जागतिक ऐतिहासिक वारस्यांचे जतन सवंर्धन व संरक्षण" | 152 |
| 38 | प्रा. कोकाटे के.वि. | संत तुकाराम महाराज यांचे सामाजिक प्रबोधनकार्य | 158 |
| 39 | प्रा. नंदकिशोर प्रेमचंद शिंगाडे | हरितगृह परिणाम एक विश्वव्यापी पर्यावरणीय समस्या | 160 |
| 40 | कु. संघमित्रा एस. चव्हाण | योगाभ्यास दवारा महिलांच्या शारिरीक क्षमता व स्वास्थाचे परिक्षण | 164 |
| 41 | प्रा. डॉ. हिराजी बनपूरकर | संत तुकारामांच्या अभंगातील आर्तता | 168 |
| 42 | प्रा. आरती डी. महेशकर | भारतातील थेट विदेशी गूंतवणुकीची आव्हाने, परिणामकारकता आणि भवितव्य | 172 |
| 43 | प्रा. सौ. मोरे निर्मला वसंतराव | मराठी ललितगद्य साहित्यातील व्यक्तिचित्रण संकल्पना व स्वरूप आणि वैशिष्टये | 175 |
| 44 | *प्रा. डॉ. हरिदास देवीदास आकोटकार* | *तुकोबांच्या ब्रह्मसाक्षात्काराचे स्वरुप* | 178 |
| 45 | प्रा.डॉ.मनिषा अनिल कचवे | स्त्रियांना सामाजिक न्याय मिळविण्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | 184 |
| 46 | प्रा.डॉ. विनोद मारोतराव बाली | स्त्री मुक्ती विषयक जोतीबा फुलेचे कार्य | 189 |

ISSN - 2278-9308

# जपानचा आक्रमक राष्ट्रवाद व दुसरे महायुध्द

प्रा. डॉ. वाय एम. साळुंके

कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओझर मिग, ता. निफाड जि. नाशिक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सलंग्न,

इ.स. १९०४-०५ च्या रशिया-जपान युध्दामुळे जपानची आंतरराष्ट्रीय राजकाराणातील प्रतिष्ठा खूपच वाढली. त्याचबरोबर पूर्व अशियाच्या राजकारणात जपानच्या भूमिकेला निर्णायक महत्त्व प्राप्त झाले. या शुध्दाने जपानच्या मनोवृत्तीतही महत्त्वपूर्ण बदल घडवून आणला. रशियासारख्या सत्तेला युध्दात पराभूत केल्यामुळे जपानला नवा आत्मविश्वास प्राप्तझाला. जपानमध्ये राष्ट्रवादी भावना वाढीस लागली आणि त्या राष्ट्रवादाने आक्रमक रूप धारण केले. त्यामुळे जपानने विस्तारवादी धोरणचा अंगिकार केला. आपल्या राष्ट्राला हिसंबंधाचे रक्षण करण्यासाठी विस्तारवादी धोरणाचा स्वीकार करणे आवश्यक आहे, अशी जपानी राज्यकर्त्यांची मनोभूमिका बनली.

आपले विस्तारवादी धोरण पुढे रेटण्याचा उद्देशानेच जपानने पहिल्या महायुध्दात सहभागी होण्याचे ठरविले. त्यानुसार त्याने १९१४ मध्ये जर्मनीविरूध्द युध्दाची घोषणा केली. अर्थात, त्याचा डोळा खऱ्या अर्थाने चीनवरच होता. इ.स. १९१५ मध्ये त्याने आपल्या २१ मागण्यांचा खलिता चीनी सरकारला सादर केला. यावेळी चीनमध्ये अंतर्गत बंडाळीची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे चीनी सरकार जपानशी संघर्ष करण्याच्या अवस्थेत नव्हते. तेव्हा चीनने तडजोडीची भूमिका घेऊन जपनच्या काही मागण्या मान्य केल्या. पुढे महायुध्दाच्या समाप्तनंतर अमेरिकेने पुढाकार घेऊन वॉशिंग्टन परिषद आयोजित केली- इ.स. १९२२. या परिषदेचा प्रमुख उद्देश जपानच्या वाढत्या प्रभावाला आळा घालून त्याच्या विस्तारवादाला शह देणे व चीनला दिलासा मिळवून देणे हा होता. त्यानुसार या परिषदेने चीनच्या सार्वभौमत्त्वाचा आदर करण्याची हमी दिली आणि यापुढे कोणत्याही परकीय सत्तेला चीनच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करता येणार नाही, असे स्पष्ट केले. याप्रमाणे वॉशिंग्टन परिषदेने जपानच्या विस्तारवादी धोरणाला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्यामुळे जपानच्या भूमिकेत बदल झाला नाही. उलट, पहिल्या महायुध्दांनंतरच्या काळात जपानी राष्ट्रवादाचे आक्रमक स्वरूप अधिकच स्पष्ट झाले. त्याच्या आक्रमक राष्ट्रवादाची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**जपानच्या राजकारणावर लष्कराचा असलेला प्रभाव:**मेईजी राज्यक्रांतीनंतर जपानमध्ये लष्कराचा प्रभाव वाढू लागला. चीन व रशिया यांच्याशीझालेल्या युध्दांत जपानी लष्कराने अत्यंत मोलाची कामगिरी बजावली होती. या युध्दांतील विजयाने जपानची प्रतिष्ठा उंचावली होती. त्यामध्ये अर्थातच जपानी लष्कराचा महत्त्वाचा वाटा होता. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनांत लष्कराविषयी आदराची भावना निर्माण झाली. जपानला जागतिक राजकारणात मानाचे स्थान प्राप्त करून देण्याचे कार्य लष्करच करू शकेल, असे तिला वाटू लागले. त्यातून राष्ट्राच्या प्रगतीसाठी लष्कराचे बळ वाढविले पाहिजे हा विचार मान्यता पावू लागला. संपन्न राष्ट्र, समर्थ लष्कर ही घोषणा लोकप्रिय होऊ लागली. जपानमधील राष्ट्रवादी विचारवंतांनी देशाच्या राजकारणात सैनिक व शेतकरी वर्गांना महत्त्व असले पाहिजे, या मताचा पुरस्कार चालविला. त्यामुळे देशात लष्कराची प्रतिष्ठा वाढली. जपानच्या अंतर्गत राजकारणात लष्कर हा प्रभावी घटक बनला. या काळात जपानमध्ये नागरी सरकार अधिकारावर असले, तरी लष्कराच्या वाढत्या प्रभावामुळे ते परराष्ट्र धोरणविषयक प्रश्नांबाबत लष्करी अधिकाऱ्यांच्या मताकडे दुर्लक्ष करण्याची हिम्मत दाखवू शकत नव्हते. देशातील सर्वसामन्य व राष्ट्रवादी विचारवंत यांच्या पाठिंब्यामुळे लष्कराचा आत्मविश्वासही वाढला होता. लष्करात आक्रमक नीतीचा पुरस्कार करणाऱ्या अधिकाऱ्यांचा प्रभावी गट तयार होऊ लागला होता. हा गट परराष्ट्र धोरणाबाबत आक्रमक नीतीचा अवलंब करण्याविषयी नागरी प्रशासनावर दबाव आणू लागला.

**भांडवलशाहीचा विकास :** मेईजी राज्यक्रांतीनंतर जपानमध्ये आधुनिक उद्योगधंद्यांची मोठया प्रमाणावर वाढ झाली. त्यामुळे देशाची वेगाने प्रगती होऊ लागली. त्यातूनच तेथे भांडवलशाहीच्या विकासाला चालना मिळाली. देशात अनेक भांडवलदार घराणी उदयास आली व त्यांनी जपानी अर्थव्यवस्थेवर नियंत्रण प्रस्थापित केले. भांडवलशाहीच्या

ISSN - 2278-9308

विकासाबरोबरच भांडवलदार वर्गाचा राजकारणावरील प्रभावही वाढू लागला. युरोपातील भांडवलशाहीच्या विकासाला साम्राज्यवादाचा मोठया प्रमाणावर हातभार लागला होता. त्यामुळे, जपानी भांडवलदारांनाही असे वाटू लागले की, आपल्या देशातील भांडवलशाहीच्या हितरक्षणासाठी येथील सरकारने विस्तारवादी धोरणांचा अवलंब करणे आवश्यक आहे.

**जपानची वाढती लोकसंख्या :** या कालखंडात जपानची लोकसंख्याझपाटयाने वाढत होती. या वाढत्या लोकसंख्येला पुरेसा रोजगार मिळवून देणे ही तेथील सरकारच्या दृष्टीने मोठी समस्या बनली होती. जपाना भू-प्रदेश लहान असल्यामुळे देशातील उपलब्ध साधनसंपत्तीच्या जोरावर वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविणे त्या देशाला शक्य नव्हते. अशा परिस्थितीत जपान बाहेर आपल्या वसाहती निर्माण करूनच वाढत्या लोकसंख्येची सोय लावता येईल, असे जपानी राज्यकर्त्यांना वाटू लागले. त्याकरिता विस्तारवादी धोरणाचा अवलंब करण्याचे त्यांनी ठरविले. आपल्या या धोरणास देशातील जनतेचे सहकार्य मिळविण्यासाठी त्यांनी जनतेच्या राष्ट्रवादी भावनांना आवाहन करून जनतेमध्येही आक्रमक वृत्ती निर्माण केली. साहजिकच, जपानी सरकारच्या साहसवादाला जनता कडूनदेखीलसमर्थन लाभू लागले.

**जपानची राजकीय महत्त्वाकांक्षा :** जपानने एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस चीनवर व विसाव्या शतकाच्या प्रारंभी रशियावर लष्करी विजय मिळविल्यामुळे त्याची राजकीय महत्त्वाकांक्षा वाढली होती. या काळात पूर्ण अशियाच्या राजकारणात जपानचे महत्त्व बरेच वाढले होते. या परिस्थितीचा उपयोग करून घेऊन पूर्व आशियात आपले प्रभावक्षेत्र निर्माण करावे, असे त्या देशाला वाटू लागले. या राजकीय महत्त्वाकांक्षेपोटी त्याने साम्राज्यविस्ताराचा मार्ग स्विकारला. जपानच्या आक्रमक राष्ट्रवादास त्याचा हा साम्राज्यवाद बऱ्याच अंशी कारणीभूत झाला.

**जागतिक मंदीचा जपानच्या अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम:** इ.स. १९२९ च्या सुमारास जगात आर्थिक मंदिची लाट आली होती. या जागतिक मंदीचा फटका जगातील अनेक देशांना बसला. जपानची अर्थव्यवस्थाही त्यापासून वाचू शकली नाही. जागतिक मंदीच्या लाटेचा जपानच्या अर्थव्यवस्थेवर अत्यंत प्रतिकूल परिणाम झाला. त्याच्या निर्यात व्यापारात प्रचंड घट झाली. त्यामुळे तेथील अनेक उद्योगधंदे धोक्यात आले. उद्योगधंद्यातील मंदीची झळ शेती व व्यापार या क्षेत्रांनाही पोहोचली. परिणामत: देशाची अर्थव्यवस्था संकटात सापडली. या संकाटातून मार्ग काढण्यासाठी इतर देशांतील बाजारपेठ काबीज करून निर्यातीला चालना देणे आवश्यक आहे, असे जपानी राज्यकर्त्यांना वाटू लागले. अर्थात, बाहेरच्या बाजारपेठा काबीज करावयाच्या तर विस्तारवादी धोरणाचा अवलंब करणे भागच होते.

**पूर्व अशियातील राजकीय परिस्थिती :** पहिल्या महायुध्दानंतरची पूर्व आशियातील राजकीय परिस्थितीही जपानच्या साहसवादी व आक्रमक धोरणाला अनुकूल ठरणारी अशीच होती. वर उल्लेख केल्याप्रमाणे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून पूर्व आशियाच्या राजकारणात जपानचे महत्त्व वाढत चालले होते. इ. स. १९२२ च्या वॉशिंग्टन परिषदेने चीनचे सार्वभौमत्त्व व प्रादेशिक अखंडता यांचे रक्षण करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे प्राश्चिमात्य राष्ट्रांच्या विस्तारवादावर नियंत्रण आले होते. यावेळी चीनचे मध्यवर्ती शासन दुर्बल बनले होते. आपण या संधीचा फायदा घेऊन चीनमध्ये हातपाय पसरण्याचा प्रयत्न करावा, असे जपानला वाटू लागले. वास्तविक, वॉशिंग्टन परिषदेमध्ये जपानही सहभागी झाला होता. त्यामुळे चीनच्या सार्वभौमत्त्वाचा आदर करण्यास तो सुध्दा बांधील होता, परंतु वॉशिंग्टन परिषदेने केलेली व्यवस्था आपल्या हितसंबंधांच्या आड येणारी आहे, असे जपानला काही काळा स्वस्थ राहिला होता. पण १९२९ च्या आर्थिक मंदीच्या काळापासून जपानच्या महत्त्वाकांक्षेने परत उचल खाल्ली. आपण आक्रमक भूमिका घेतली तरी पाश्चात्य राष्ट्रे फारसा विरोध करणार नाहीत, असा त्यांचा समज झाला.

**जपानचे मांचुरियावरील आक्रमण :** पहिल्या महायुध्दानंतरचा जपानचा आक्रमक राष्ट्रवाद व लष्करवाद यातूनच जपानने आपले लक्ष चीनच्या मांचुरिया या प्रदेशाकडे वळविले. मांचुरिया हा चीनचा अविभाज्य भाग होता. त्या ठिकाणी लोखंड दगडीकोळसा इत्यादी खनिज संपत्ती मोठया प्रमाणावर उपलब्ध होती. त्यामुळे, उद्योगाधांच्या विकासाच्या दृष्टीने तो प्रदेश अनुकूल होता. या प्रदेशावर रशियाचाही डोळा होता, परंतु १९०४-०५ च्या रशिया-जपान युध्दात रशियाला जपानकडून पराभूत व्हावे लागल्यामुळे त्यास मांचुरियामधून माघार घ्यावी लागली. त्याचवेळी जपानचे आर्थिक व व्यापारी हितसंबंध तेथे निर्माण होऊ लागले होते. त्याने मांचुरियात रेल्वेमार्ग बांधले होते. तसेच इतर क्षेत्रांतही भांडवल गुंतवणूक

ISSN - 2278-9308

केली होती. साहजिकच, मांचुरियातील आपले हितसंबंध सुरक्षित राखण्याबाबत पुरेशी उपाययोजना करणे त्यास आवश्यक वाटत होते. चीनने मांचुरिया हा आपला अविभाज्य भाग आहे, असे जाहीर केल्याने जपानला मांचुरियातील आपल्या हितसंबंधाबाबत चिंता वाटू लागली. त्यातच वर उल्लेख केलेल्या कारणांमुळे विस्तारवादी धोरणाचा अवलंब करणे त्यास गरजेचे वाटू लागले. आपल्या प्रादेशिक विस्तारासाठी मांचुरिया हाच योग्य प्रदेश आहे, असे जपानी राज्यकर्त्यांचे व लष्करी नेत्यांचे मत होते. त्यामुळे मांचुरियावर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्यास तो उत्सुक झाला किंबुहूना मांचुरियावर नियंत्रण ही आपली राजकीय व आर्थिक गरज आहे, असेच त्याला वाटू लागले.

अशा प्रकारे मांचुरिया हा चीन व जपान यांच्यातील संघर्षाचे कारण बनला होता. मांचुरियातील जपानच्या आर्थिक प्रभावाला शह देण्यासाठी चीनी राज्यकर्त्यांनी प्रयत्न सुरू केले होते. तसेच त्यांनी मांचुरियात जपानविरूध्द प्रचाराची जोरदार आघाडी उघडली होती. त्यामुळे तर जपान अधिकच अस्वस्थ बनला. चिनविरूध्द लष्करी कारवाई करण्यासाठी तो काहीतरी निमित्त शोधू लागला. हे निमित्तही त्याला लवकरच मिळाले. इ.स. १९३१ च्या जून महिन्यात नाकामुरा नावाच्या एका जपानी कॅप्टनचा मांचुरियात खुण झला. वास्तविक पाहता या खुणाशी चिनी सरकारचा कसलाही संबंध नव्हता परंतु, संघर्षासाठी निमित्ताला टेकलेल्या जपानने खूनाची जबाबदारी चीनी सरकारवर टाकली. आपल्या एका लष्करी अधिकाऱ्याच्या खूनाचा बदला घेतलाच पाहिजे, अशी मागणी जपानी नागरिकही करू लागले. त्यातच १८ सप्टेंबर १९३१ रोजी मांचुरियातील जपानी मालकीच्या साऊथ मांचुरियन रेल्वे मार्गावर बाँबस्फोटझाला. या बाँबस्फोट रेल्वेमार्गाचे विशेष नुकसान झाले नव्हते. परंतु, चीनी सैन्यानेच हा बॉम्बस्फोट घडवून आणला असे सांगून जपानने आपले सैन्य मांचुरियात घुसविले. त्याचे हे आक्रमण इतके पूर्वनियोजित होते की, त्याने अल्पावधीतच संपूर्ण मांचुरियावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले- इ.स. १९३१. चीनचे दुर्बल सैन्यदल जपानी आक्रमणाला तोंड देण्यात पूर्णपणे अपयशी ठरले.

**मांचुकूओची स्थापना :** मांचुरियावर ताबा मिळाविल्यानंतर जपानने त्या प्रदेशातून चीनचे सर्वार्थाने उच्चाटन करण्याचा प्रयत्न सुरू केला. प्रथम त्याने मांचुरियातून चीनी लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली. मांचुरियाचे चीनशी असलेले सर्व प्रकारचे संबंध तोडण्यात आले. मांचुरिया हे स्वतंत्र राज्य असल्याचे जपानने जाहीर केली. त्याच्याही पुढे जाऊन मांचुरिया या नावातच बदल करून १८ फेब्रुवारी १९३२ रोजी मांचुकओ असे नवे नाव त्यास देण्यात आले. मांचुकाओचे स्वतंत्र सरकार स्थापन झाल्याची घोषणा जपानने केली परंतू खऱ्या अर्थाने ते सरकार स्वतंत्र नव्हते ते तर जपानने उभे केलेले कळसूत्री बाहुले होते. त्यावर जपानचे पूर्ण नियंत्रण होते. तथापि, बाह्य जगाची दिशाभूल करण्यासाठी जपानने हे दिखाऊ सरकार तेथे स्थापन केले.

जपानने मांचुरियाचा ताबा घेतल्यावर चीनने त्याबाबत राष्ट्रसंघाकडे तक्रार नोंदविली. राष्ट्रसंघाने एका ठरावाद्वारे जपानला मांचुरियातून माघार घेण्यास सांगितले. त्यानंतर राष्ट्रसंघाने मांचुरियाच्या प्रश्नासंबंधी माहिती घेण्यासाठी लॉर्ड लिटन यांच्या अध्यक्षतेखाली एका चौकशी कमिशनची नियुक्ती केली. या कमिशनने सादर केलेल्या अहवालाचा विचार करून राष्ट्रसंघाने जपानला आपले सैन्य मांचुरियातून काढून घेण्यास परत एकदा सांगितले परंतु, राष्ट्रसंघाची सूचना जपानने मान्य केली नाही. इतकेच नव्हे तर आपण राष्ट्रसंघाचाच त्याग केल्याचे त्याने घोषित केले.

मांचुरियाचा घास घेऊनच जपान स्वस्थ बसला नाही, तर त्याने चीनविरूध्दचे आक्रमक धोरण तसेच पुढे चालू ठेवण्याचा निश्चय केला. मांचुरियातील विजयाने त्याची महत्त्वकांक्षा अधिकच वाढली. मांचुरियातील त्याचे आक्रमण रोखण्यास राष्ट्रसंघही अपयशी ठरला. त्यामुळे जपानचा विस्तारवाद पुढील काळात वाढतच गेला. इ.स. १९३३ मध्ये त्याने चीनचा जेहोल हा प्रदेश जिकून घेतला व तो नव्या मांचुकूओ राज्याला जोडण्यात आला. यावेळी चीनमध्ये कोमिंटांग व कम्युनिस्ट यांच्यात यादवी युध्द सुरू होते. चीनमधील अंतर्गत यादवीचा जपानने आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेतला. त्याने चँग-कै-शेकच्या कोमिंटांग सरकारवर दबाव आणून आपल्या काही मागण्या मान्य करण्यास त्यास भाग पाडले. चीनी कम्युनिस्टांनी उभ्या केलेल्या आव्हानामुळे हतबल झालेल्या चँग-कै-शेकला जपानच्या मागण्या मान्य करण्याखेरीज गत्यंतरच नव्हते. चीनच्या होपै व इतर काही प्रांतात स्वायत्त राजकीय मंडळे स्थापन करण्यात जपानने यश मिळविले. या स्वायत्त मंडळांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करून तेथील कोमिंटांग सरकारचा प्रभाव त्याने नष्ट केला.

ISSN - 2278-9308

केली होती. साहजिकच, मांचुरियातील आपले हितसंबंध सुरक्षित राखण्याबाबत पुरेशी उपाययोजना करणे त्यास आवश्यक वाटत होते. *चीनने मांचुरिया हा आपला अविभाज्य भाग आहे, असे जाहीर केल्याने जपानला मांचुरियातील आपल्या* हितसंबंधाबाबत चिंता वाटू लागली. त्यातच वर उल्लेख केलेल्या कारणांमुळे विस्तारवादी धोरणाचा अवलंब करणे त्यास गरजेचे वाटू लागले. आपल्या प्रादेशिक विस्तारासाठी मांचुरिया हाच योग्य प्रदेश आहे, असे जपानी राज्यकर्त्यांचे व लष्करी नेत्यांचे मत होते. त्यामुळे मांचुरियावर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्यास तो उत्सुक झाला किंबहूना मांचुरियावर नियंत्रण ही आपली राजकीय व आर्थिक गरज आहे, असेच त्याला वाटू लागले.

अशा प्रकारे मांचुरिया हा चीन व जपान यांच्यातील संघर्षाचे कारण बनला होता. मांचुरियातील जपानच्या आर्थिक प्रभावाला शह देण्यासाठी चीनी राज्यकर्त्यांनी प्रयत्न सुरू केले होते. तसेच त्यांनी मांचुरियात जपानविरूध्द प्रचाराची जोरदार आघाडी उघडली होती. त्यामुळे तर जपान अधिकच अस्वस्थ बनला. चिनविरूध्द लष्करी कारवाई करण्यासाठी तो काहीतरी निमित्त शोधू लागला. हे निमित्तही त्याला लवकरच मिळाले. इ.स. १९३१ च्या जून महिन्यात नाकामुरा नावाच्या एका जपानी कॅप्टनचा मांचुरियात खुण झला. वास्तविक पाहता या खुणाशी चिनी सरकारचा कसलाही संबंध नव्हता परंतु, संघर्षासाठी निमित्ताला टेकलेल्या जपानने खूनाची जबाबदारी चीनी सरकारवर टाकली. आपल्या एका लष्करी अधिकाऱ्याच्या खूनाचा बदला घेतलाच पाहिजे, अशी मागणी जपानी नागरिकही करू लागले. त्यातच १८ सप्टेंबर १९३१ रोजी मांचुरियातील जपानी मालकीच्या साऊथ मांचुरियन रेल्वे मार्गावर बॉंबस्फोटझाला. या बॉंबस्फोट रेल्वेमार्गाचे विशेष नुकसान झाले नव्हते. परंतु, चीनी सैन्यानेच हा बॉम्बस्फोट घडवून आणला असे सांगून जपानने आपले सैन्य मांचुरियात घुसविले. त्याचे हे आक्रमण इतके पूर्वनियोजित होते की, त्याने अल्पावधीतच संपूर्ण मांचुरियावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले- इ.स. १९३१. चीनचे दुर्बल सैन्यदल जपानी आक्रमणाला तोंड देण्यात पूर्णपणे अपयशी ठरले.

**मांचुकूओची स्थापना :** मांचुरियावर ताबा मिळविल्यानंतर जपानने त्या प्रदेशातून चीनचे सर्वार्थाने उच्चाटन करण्याचा प्रयत्न सुरू केला. प्रथम त्याने मांचुरियातून चीनी लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली. मांचुरियाचे चीनशी असलेले सर्व प्रकारचे संबंध तोडण्यात आले. मांचुरिया हे स्वतंत्र राज्य असल्याचे जपानने जाहीर केली. त्याच्याही पुढे जाऊन मांचुरिया या नावातच बदल करून १८ फेब्रुवारी १९३२ रोजी मांचुकओ असे नवे नाव त्यास देण्यात आले. मांचुकाओचे स्वतंत्र सरकार स्थापन झाल्याची घोषणा जपानने केली परंतू खऱ्या अर्थाने ते सरकार स्वतंत्र नव्हते ते तर जपानने उभे केलेले कळसूत्री बाहुले होते. त्यावर जपानचे पूर्ण नियंत्रण होते. तथापि, बाह्य जगाची दिशाभूल करण्यासाठी जपानने हे दिखाऊ सरकार तेथे स्थापन केले.

जपानने मांचुरियाचा ताबा घेतल्यावर चीनने त्याबाबत राष्ट्रसंघाकडे तक्रार नोंदविली. राष्ट्रसंघाने एका ठरावाद्वारे जपानला मांचुरियातून माघार घेण्यास सांगितले. त्यानंतर राष्ट्रसंघाने मांचुरियाच्या प्रश्नासंबंधी माहिती घेण्यासाठी लॉर्ड लिटन यांच्या अध्यक्षतेखाली एका चौकशी कमिशनची नियुक्ती केली. या कमिशनने सादर केलेल्या अहवालाचा विचार करून राष्ट्रसंघाने जपानला आपले सैन्य मांचुरियातून काढून घेण्यास परत एकदा सांगितले परंतु, राष्ट्रसंघाची सूचना जपानने मान्य केली नाही. इतकेच नव्हे तर आपण राष्ट्रसंघाचाच त्याग केल्याचे त्याने घोषित केले.

मांचुरियाचा घास घेऊनच जपान स्वस्थ बसला नाही, तर त्याने चीनविरूध्दचे आक्रमक धोरण तसेच पुढे चालू ठेवण्याचा निश्चय केला. मांचुरियातील विजयाने त्याची महत्त्वकांक्षा अधिकच वाढली. मांचुरियातील त्याचे आक्रमण रोखण्यास राष्ट्रसंघही अपयशी ठरला. त्यामुळे जपानचा विस्तारवाद पुढील काळात वाढतच गेला. इ.स. १९३३ मध्ये त्याने चीनचा जेहोल हा प्रदेश जिकून घेतला व तो नव्या मांचुकूओ राज्याला जोडण्यात आला. यावेळी चीनमध्ये कोमिंटांग व कम्युनिस्ट यांच्यात यादवी युध्द सुरू होते. चीनमधील अंतर्गत यादवीचा जपानने आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेतला. त्याने चॅंग-कै-शेकच्या कोमिंटांग सरकारवर दबाव आणून आपल्या काही मागण्या मान्य करण्यास त्यास भाग पाडले. चीनी कम्युनिस्टांनी उभ्या केलेल्या आव्हानामुळे हतबल झालेल्या चॅंग-कै-शेकला जपानच्या मागण्या मान्य करण्याखेरीज गत्यंतरच नव्हते. चीनच्या होपै व इतर काही प्रांतात स्वायत्त राजकीय मंडळे स्थापन करण्यात जपानने यश मिळविले. या स्वायत्त मंडळांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करून तेथील कोमिंटांग सरकारचा प्रभाव त्याने नष्ट केला.

**इ.स. १९३७ चे चीन जपान युध्द :** जपानला या वेळेपर्यंत चीनी सरकारच्या दुर्बलतेची पुरती कल्पना आली होती. आपले विस्तारवादी धोरण पुढे रेटण्यास हीच अनुकूल वेळ आहे, हे त्याने ओळखले. त्यामुळे चीनचा अधिकाधिक प्रदेश बळकविण्याच्या जपानच्या प्रयत्नात इ.स. १९३१ नंतर मुळीच खंड पडला नाही. या सुमारास जपानमध्येही लष्कराने उचल खाल्ली. आपल्या विस्तारवादी धोरणास विरोध करणाऱ्या शक्तींच्याविरूध्द लष्करातील जहालमतवादी अधिकाऱ्यांनी आघाडी उघडली. उदारमतवादी धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय नेत्यांना व मुलकी अधिकाऱ्यांना आपल्या मार्गातून दूर करण्याचा त्यांनी चंग बांधला. देशाच्या लष्करीकरणाची योजना कार्यवाहीत आणण्याचा प्रयत्नही त्यांनी चालूच ठेवला. जपानमधील आत्यंतिक राष्ट्रवादी गटाने आपली शक्ती लष्कराच्या मागे उभी केली. जपानी सरकारच्या विस्तारवादी धोरणास तेथील लष्कराचे दडपणही बऱ्याच अंशी कारणीभूत ठरले. जपानमध्ये वाढू लागलेला लष्करवाद तेथील सरकारला तडजोडीचे किंवा सामोपचाराचे धोरण स्वीकारून देण्यास मुळीच तयार नव्हता.

या काळात चीनमध्येही राष्ट्रवादी विचारांना चालना मिळाली होती. परिणामी तेथे जपानविरोधी भावना वाढीस लागली. आतापर्यंत एकमेकांच्या विरूध्द संघर्ष करीत आलेल्या कोमिटांग व कम्युनिस्ट पक्षांना जनतेच्या दबावामुळे जपानी आक्रमकांविरूध्द हातमिळवणी करणे भाग पडले. कोमिटांग-कम्युनिस्ट युतीमुळे अस्वस्थ झालेल्या जपानने कोमिटांग सरकारवडे अशा मागण्या केलया की, त्याने कम्युनिस्टांची संगत सोडून द्यावी व उत्तर चीन विभागात आपणास विशेष सवलती द्याव्यात. त्याच्या या मागण्या कोमिटांग सरकारने फेटाळून लावल्या.

कोमिंटांग-कम्युनिस्ट युतीने आपल्यापुढे निर्माण केलेल्या धोक्याचा विचार करून जपानने लष्करी बळाच्या जोरावर चीनचा जास्तीत जास्त प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्याने मार्कोपोलो ब्रिज प्रकरणाचे निमित्त करून ७ जुलै, १९३७ रोजी चीनी प्रदेशात आपले सैन्य घुसविले. इ.स. १९३७ च्या अखेरीपर्यंत जपानने चीनचे होपै, शेन्सी, चाहार हे प्रांत जिंकून घेतले आणि कोमिंटांगचे नानकिंग हे राजधानीचे शहरही काबीज केले. इ.स. १९३८ च्या अखेरीपर्यंत त्याने शांघाय, हँको व कँटन यांवर ताबा मिळविला. अशा प्रकारे दोन वर्षांच्या कालवधीत जपानने चीनचे अनेक महत्त्वाचे प्रांत, प्रमुख शहरे व लोहमार्ग आपल्या नियंत्रणाखाली आणले.

**जपानच्या दुसऱ्या महायुध्दात प्रवेश :** जपानच्या विस्तारवादी धोरणामुळे अमेरिका व इतर काही पाश्चात्य देश यांचा त्यास विरोध होऊ लागला. तेव्हा आंतरराष्ट्रीय राजकारणात नवे मित्र जोडण्याच्या उद्देशाने जपानने इ.स. १९३६ मध्ये जर्मनीशी कम्युनिस्टविरोधी करार केला. पुढे २६ सप्टेंबर १९४० रोजी जपान, जर्मनी व इटली या तिघांनी एकत्र येऊन त्रिपक्ष करार केला. या करारामुळे साम्राज्यवादाचा पुरस्कार करणारी तीन फॅसिस्ट राष्ट्रे एकत्र आली.

दुसरे महायुध्द सुरू झाल्यावर इंडोचायनाचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा जपानने प्रयत्न चालविला. या प्रदेशावर फ्रन्सचे नियंत्रण होते, परंतु, युध्दाच्या प्रारंभीच जर्मनीने फ्रान्सला पराभूत केल्याने आपणास मिळालेली ही सुवर्णसंधीच आहे, असे जपानला वाटले आणि इ.स. १९४१ मध्ये त्याने इंडोचायनात आपले लष्कर घुसविले. जपानच्या या कृतीमुळे अमेरिकेने आपल्या देशातील जपानची सर्व मालमत्ता गोठविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे जपानची आर्थिक कोंडी होऊ लागली. अमेरिकेशी वाटाघाटी करून या परिस्थितीतून मार्ग काढावा, असे जपानमधील काही राजकीय नेत्यांचे मत होते, परंतु, लष्कराला हे मत मान्य नव्हते. आपले राजकीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी अमेरिकेशी युध्द करणे आवश्यक आहे, अशी भूमिका लष्करी नेत्यांनी घेतली. या प्रश्नावर मतभेद झाल्याने पंतप्रधान कोनोये याने राजीनामा दिला. त्यानंतर १८ ऑक्टोबर, १९४१ जनरल तोजो याने देशाची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतले.

अमेरिकेने केलेल्या आर्थिक कोंडीला युध्द हेच उत्तर आहे, अशी तोजो याची धारणा होती. त्यामुळे ७ डिसेंबर १९४१ रोजी जपानने पॅसिफिक महासागारातील अमेरिकेचया पर्ल हार्बर येथील नाविक तळावर आकस्मित हल्ला चढवून अमेरिकेच्या युध्दनौका व विमाने यांचा प्रचंड विध्वंस केला. जपानच्या या अनपेक्षित हल्ल्याने अमेरिकेत संतापाची लाट उसळली. ८ डिसेंबर १९४१ रोजी अमेरिकेने जपानविरूध्द युध्द पुकारले. इंग्लंडनेही जपानविरूध्द युध्द पुकारले. अशा प्रकारे जपानचा दुसऱ्या महायुध्दात प्रवेश झाला.

**जपानचे विजय, पिछेहाट व शरणागती :** युध्दात उतरल्यावर जपानने आग्नेय आशियात जोरदार मुंसडी मारली. अल्पावधीतच त्याने हाँगकाँग, सिंगापूर, मलाया, फिलिपाईन्स, ब्रम्हदेश हे देश जिंकुन घेतले. आशिया खंडातील इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका यांच्या वसाहती जपानने आपल्या नियंत्रणाखाली आणल्या. त्याच्या आरमाराने हिंदी महासागारावर देखील आपले वर्चस्व प्रस्थापित केले. जपानचे हे विजय खरोखरच विस्मयजनक होते.

इ.स. १९४२ पासून मात्र जपानच्या पिछेहाटीला सुरूवात झाली. अमेरिकेच्या आरमाराने जपानी आरमाराचा काही ठिकाणी पराभव केला. इ. स. १९४३ पासून युरोपातील युध्दाचे पारडे दोस्त राष्ट्रांच्या बाजूने झुकू लागल्यावर दोस्त राष्ट्रांनी जपानविरूध्दही जोरदार आघाडी उघडली. त्यामुळे जपानला अनेक ठिकाणी माघार घ्यावी लागली. इ.स. १९४५ मध्ये जर्मनीने शरणागती पत्करल्यावर जपानचा पराभवही स्पष्ट दिसू लागला, तरीही त्याने लवकर शरणागती स्वीकारली नाही. त्यामुळे जपानच्या हिरोशिमा व नागासाकी शहरांवर अमेरिकेने अणुबाँब प्रयोग केला. अखेरीस १४ ऑगस्ट १९४५ रोजी जपानी सम्राटाने युध्दसमाप्तीची घोषणा केली, त्याबरोबरच दुसऱ्या महायुध्दाचाही शेवट झाला.

**संदर्भ साधने :**


१) जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड ६, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
२) डॉ. कुलकर्णी. अ. रा, देशपांडे. अ. म, देशपांडे. प्र.न, आधुनिक जगाचा इतिहास, भाग पहिला, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे
३) डॉ. गद्रे प्रभाकर, जपानचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर.
४) राजदेरकर सुहास, गर्गे स.मा, आधुनिक जगाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९६.
५) Dr. Chaurasia. R. S, History of Modern Japan, King Educational Publishers, Delhi.